<u>खंड 9 वा</u>

रामप्रभूच्या मनीं विरक्ति। करी राज्य पण नच आसक्ति ।।
नारीकेल फल आतुनि सुटते। गमत सारखे बघणाराते।।
बघणारा नच अंतरज्ञानी। म्हणे हेंच ते बघुनि लोचनी।।
असेल ज्ञानी करात घेइल। कर्ण संपुटी तया पारखिल।।
सुकले पाणी शब्द उमटतो। अरिहंताचा नाद ब्रह्मतो।। 1

राम प्रभूची ब्रह्म भावना। नित उपदेशी प्रजानांना।।
कुणी निमाले दुरावले कुणि। कुणि घेति रस राजशासनी।।
पत्नि पुत्र वा बंधू सोयरे। प्रजा प्रजापति आणिक दुसरे।।
जरी आपुले मी न तयाचा। विरक्त बाणा रामप्रभूचा।। 2

विरक्त वृत्ति लोकसंग्रही। तिथे आपपर कुठेच नाही।।
असो सान वा असो थोर तो। असो शत्रु वा असो मित्र तो।।
असो प्रपंची कुणि परमार्थी। उपदेशामृत पाजि तयाप्रति।।3

उपदेश:मृत वचन माधुरी। स्वये तरू नि या जनास तारी।।
तीच जगाची तारक नौका। जिन धर्माची पुण्य पताका।।
राम डोलवी नित नत मस्तक। भरत बंधुगण शत्रूघ्नादिक।।
होति अंतरी तृप्त प्राशुनि। रामप्रभूची विवेक वाणी।। 4

म्हणे राम प्रभू जीवा मानवा। भवसागर हा भयाण वणवा।।
यातुनि आपण तरावयाचे। पैल तिरावर स्थिरावयाचे।।
जे तरले ते सदैव तरले। आणि तयानी जग उद्धरिले ।।
जगद्‌गुरू ते जीव जितेंद्रिय। आत्मसुखी ते ते सुख अक्षय।। 5

श्रीरामाच्या जीवनातील एक भाग सांगून झाल्यावर त्यांच्या जीवनाला व्यापून राहाणारी त्यांची अध्यात्म-भावना या प्रकरणात सांगितली जात आहे. रामाचे जीवन वरू न वरू न पाहाणाऱ्याला एखाद्या ऐश्वर्यसंपन्न सम्राटाप्रमाणे वाटणे साहजिकच आहे. रामाचे राज्य हे जरी ऐहिकतेचे अनुकरण करणारे असले तरी त्या श्रीरामाचे हृदय पूर्णत: विरक्त होते. एखाद्या वाळलेल्या नारळात ज्या प्रमाणे नारळाचा आतील भाग वेगळा होतो व त्याचे कवच वेगळे होऊन राहाते, त्याप्रमाणे श्रीरामाचा अंतरात्मा सर्व मोहव्यामोहातून अलिप्त होता. अनेक प्रकारच्या संसारिक सुख-दु:खांच्या अनुभवाने जीवनाचे रहस्य त्याला कळाले होते. सारे विश्वाचे कोडे श्रीरामाला अवगत झाले. एका निराकार परब्रह्म आत्म्याच्या ज्ञान ज्योती पलिकडे दुसरे काहीच सत्य नाही, याची जाण त्या परिपक्व हृदयात अवतरली होती. नारळातील अहंकाराचे पाणी वाळून गेले होते. आणि एकारलेल्या नारळातील ब्रह्मनादच तेवढा उरला होतो.

श्रीरामाचे हृदय ब्रह्मभावनेने इतके व्याप्त झाले होते की त्यांच्या मनात द्वैत भावना उरली नव्हती. साऱ्या प्रजेत राम साकारला होता. साऱ्या प्रजाजनांच्या सुख-दु:खात, जन्म-मरणात, यश-अपयशात रामाचे प्रेममय शब्द असत. साऱ्यांशी एकरू प होऊनही तो स्वत: विरक्त अशा विरक्ती पोटीच खरा लोकसंग्रह होऊ शकतो. कारण कुणापासून काही मागायचे नसते. आहे ते सर्व द्यायचे असते. राज्यात लहान-थोर, शत्रु-मित्र, रागी-विरागी जन असायचेच. त्या सर्वांशी तादात्म भावनेने श्रीराम वागत होते.

सर्वांना उपदेशाचे अमृत पाजून, त्यांच्या दु:खावर फुंकर घालून, त्यांना सन्मार्ग दाखवून श्रीरामाचे राज्य चालत असते. असा सदुपदेशच खऱ्या अर्थाने एक नौका आहे. जी या तिरावरू न पैलतिरी नेऊन सोडते. उपदेशात आज्ञा नसते, असतो एक निर्मळ भक्तिभाव. आपल्या प्रपंचात देखील श्रीराम एखाद्या विरक्त पुरुषाप्रमाणे वागत. सर्व बंधूना, त्यांच्या पत्नींना, मुला-बाळांना नित्य प्रेममयवाणीचे बोल ऐकायला मिळत. एक लाघवी मृदुता घरीदारी व्यापून राही.

श्रीराम म्हणत इतरांची फिकीर करू नका. या भयाण वणव्यातून आपण आपली सुटका करू न घ्यायची आहे. या तिरावरू न पैलतिरी जायचे आहे. स्वत:चा उद्धार करू न घ्यायचा आहे. त्यासाठी स्वत:च्या आत्म्यातील बळ जागृत करायला हवे असते. केवळ बळ उपयोगी ठरत नाही. जो स्वत: तरेल तोच इतरांना उद्धाराचा मार्ग दाखविल. जो आंधळा आहे तो कुणास मार्ग दाखवू शकतो ? जो स्वत: जितेंद्रिंय असेल तोच इतरांना आत्मसुखाच्या अक्षय समृद्धीप्रत नेऊ शकेल.

अक्षय सुख ते हवे तुलाही। अक्षय सुख ते हवे मलाही।।
तू आणिक मी मिळुनि बने जग।  परि नश्वर ते तिथेच तगमग।।
तगमग तळमळ असंतोषतो। या भवसागरि पहा उसळतो।। 6

तरिही तरावे तुला वाटते। तरिही तरावे मला वाटते।।
आज वाटते तुला मला जे। तोच ध्यास जगि घेतिल जे जे।।
उद्धरतिल ते जीव सर्वही। देति जिनेश्वर जगास ग्वाही।। 7

उद्धराची आस अंतरी। आज उदेली तुला मल तरि।।
हाच गमे मज शकुन चांगला। हा भवसागर तरावयाला।। 8

जरी न नौका नच नावाडी। उद्धराची परी आवडी।।
आवडीत या सुगंध नादे। जगद्गुरूं चे हृदय प्रमोदे।।
घे आकर्षुनि येईल सत्वर। नेइल आम्हा पैल तिरावर।। 9

इथे तिथे जग जगात सुख ना। हे तर ठावे जगी आपणा।।
दु:ख भोगिता स्वप्न सुखाचे। कां मग पडते जिवास साचे।।
सुख स्वप्नातिल सत्य शोधिता। सत्यरू प हो जीव तत्वता।।
तोच जगातील शाश्वत आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 10

असे दिसून येते की सर्वांना अक्षय सुख हवे आहे, पण त्या मार्गाने कुणी जात नाही. सारेजण दु-खाच्याच मार्गाने जात आहेत. दु:खाला जपत आहेत. दु:ख उगाळत बसले आहेत. दु:खातून सुटण्याचा उपाय भगवंत जिनेश्वर सांगत आले आहेत. त्यानंतर साधु संतांनी तोच मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आत्मोद्धाराची सहज साधना करायला कुणी फारसे उत्सुक दिसत नाहीत. पैल तिरावर जायचे तर केवळ काठावर बसून कसे चालेल ? काही प्रयास, काही धडपड, काही प्रयत्न तर निश्चितच केले पाहिजेत ज्याच्या हृदयांत असा विवेक निर्माण होईल तो खात्रीनेच पैलतिरावर जाईल. केवळ पैल तिराला जाण्याची स्वप्ने पाहून कसे भागेल ? स्वप्ने तर स्वप्नेच आहेत. डोळे उघडताच ती विरू न जातील. म्हणून जीवात्म्याने स्वत: जागे

होऊन परमात्म्याचे दर्शन घेतले पाहिजे. आत्माचा परमात्मा होईल ही शुद्ध जाण ह्रदयी ठेवली पाहिजे जे शाश्वत तत्व आहे तिकडे लक्ष गेले पाहिजे.

तू आणिक मी भिन्न मानिता। सुख दु:खाची जगांत वार्ता।।
अगणित संख्या जगी जिवाची। तीच स्थिती त्या सुख दु:काची।।
सुख दु:खाच्या अतोत होता। पैलतीर ते ये मग हाता।।
सांगुनि गेले आज सांगती। जीव जिनेश्वर आत्मप्रचीती।। 11

आत्मप्रचीती हवी जीवनी। तोच ज्ञानमय जीव सद्‌गुणी।।
गुण सुमनाचा जगी फुलोरा। सेवि मृत्तिका सुगंध सारा।।
सुगंध ठायी बसुनि दरवळे। नकोच वाणी नकोच डोळे।।
जगि पचेंद्रिय जीव संस्कृती। भिन्न तयाहुनि आत्म जागृती।।
धनि तिचा तो तू तर आत्मा। जीव व्हायच जगि परमात्मा ।। 12

शुद्ध स्वच्छ तू सिद्ध पुरुष तू। निसर्ग सुंदर विमल ज्ञान तू।।
कधी मातिधि सुवर्ण पडते। हीन तयावर सवेचि चढते।।
जळे अग्निमधि हीन सर्वही। जसा तसा तू सुवर्ण पाही।। 13

क्षणात पर्वत क्षणात माती। निसर्ग निर्मित कालगती ती।।
कालगतिवर विजय मिळविला। सवे आत्मसुख येइल हाता।।
आत्म सुखी तू प्रसन्न आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा ।। 14

जगात भासे दृश्य सर्व ते। कुणी न निरखिति अदृश्याते।।
तो तर आत्मा आणि तोच तू। काल आज वा उद्या न हेतू।।
ब्रह्मा विष्णू महेश सारे। परमात्म्याचे स्वरू प बारे।।
ज्ञान भक्ति वैराग्ययुक्त तो। कर्मबंधनामधुनि मुक्त तो।।
आत्मसुखाची ध्वजा विराजे। समय नाम जगि तुलाच साजे।।
ऐक्य सुखद ते दु:ख भिन्नता। दु:ख प्रसवते जगी विविधता।।

गमे विविधता क्षणैक सुंदर। आदि अंति पण दु:ख निरंतर।। 15

जोपर्यंत तू-मी चा भेद आहे तो पर्यंत प्रपंच आहे, संसार आहे. साऱ्या विश्वातील हे द्वैत संपायला हवे. तूच प्रभू आहे. प्रभु ही तूच आहे. अशी सम्यक्‌प्रीती हवी आहे. श्रद्धा, प्रीती, आणि भक्ती हा एक सोपान आहे. त्यामार्गाने गेले पाहिजे. आत्मदर्शनासाठी हवी आंतरिक दृढ श्रद्धा. ज्ञानमय आत्म्याच्या दर्शनासाठी हवी जीवन क्रांती. त्या क्रांतीची किरणे आत प्रविष्ठ होऊ दिली पाहिजेत. अंतरंग अंधाराने भरू न गेले असेल तर तेथे प्रकाश नेला पाहिजे फुलांच्या सहवासाने मातीलाही सुगंध प्राप्त होतो. सारे वातावरण सौरभयुक्त होऊन जाते. तसेच आत्म्याचा गंध दरवळला पाहिजे. सुगंध नेहमी आतून बाहेर येतो तशी आत्मप्रचीती, आत्म-प्रेम आतून बाहेर आली पाहिजे. स्व-स्वामीत्वाचा भाव उदित झाल्या शिवाय, परमात्म्याशी नाते जोडल्या शिवाय ते शक्य होणार नाही. भीक मागणाऱ्याला कुणी विचारित नाही. दीनपने जगण्याने कुणी जेवायला मदत करणार नाही. आणि केलीच तरी त्याचे भिकारीपण संपणार नाही.

आत्मा स्वयमेव सिद्धत्वाचा प्रकाश आहे. सिद्धत्व त्याचा स्वभाव आहे. सुवर्णाचे सुवर्णपण त्याच्या ठायीच असते. मातीने मलिन झाले, तरी सुवर्णतेला बाधा येत नाही. तसेच कर्मबद्ध जीव कितीही कर्म-परमाणूंनी बद्ध असला तरी त्याची परमात्मशक्ती ही अभेद्य आहे. अविनाशी आहे. जे जे अशाश्वत, अनित्य, बदलणारे आहे ते ते बदलतच राहणार आहे. ती तर अवस्था आहे. अवस्थखा बदलतच राहणार. ती प्रक्रिया अनंतकाळापर्यंत चालूच राहणार आहे. म्हणून जे शाश्वततत्व आहे. त्याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

आपल्या भोवती जे दृश्य विश्व आहे त्याच्या आत जे अदृश्य लपलेले आहे. तिकडे आपले लक्ष गेले पाहिजे. शरीर दृश्य आहे त्यात परमात्म-तत्व आहे. अदृश्य आहे. शरीर नष्ट झाले तरी ते अदृश्य नष्ट होत नाही. त्याचे अमरत्व जाणवले पाहिजे, तो अंतरंगी ठाण देऊन बसलेला परमात्मा म्हणजेच ब्रह्म तोच विष्णु, तोच शंकर, सारे जे जे शाश्वत आहे, जे जे अविनाशी आहे ते ते सारे परमात्माच आहेत. नावात बदल असेल,भाषेत बदल असेल, अभिव्यक्तीच्या पद्धतीत बदल असेल परंतु त्यामुळे परमात्म्यात फरक पडत नाही. ज्ञानही तोच, आनंदही तोच, सौंदर्यही तोच, ज्ञान, भक्ती व कर्मही तोच, सत्यही तोच शिवही तोच आहे अशी जो शाश्वताबाबतची परमबुद्धी तीच आत्मदर्शनाची, आत्मज्ञानाचा सखी आहे. त्यालाच संयम म्हटले आहे.

जीव जडाचे सदैव भांडण। भांडणात त्या गमे जीव गुण।।
मांगल्याचा धनी जीव तू। दृश्य सृष्टितिल प्रसन्नता तू।।
भोग भोगणे कर्म अनादी। कर्म त्यागिता सहज समाधी।।
जगद्‌गुरूं चे घडेल दर्शन। स्फुरेल अंतरि वीतराग गुण।। 16

जीव जाणतो तरी जगाला। तरी असे तो जगावेगळा।।
समुद्र पाणी पृथ्वी मृत्तिका। तयास त्याचे नसेच शंका।।
तेवि तत्व तू जगि अविनाशी। दृष्य सृष्टिला उगाच भीशी।। 17

अखंड आत्मा खंड पृथ्विचे। अनेक तांडे तिथे जिवाचे।।
संसाराचा असा पसारा। तयात आत्मा एक बिचारा।।
सापडायचा तिथे कसा तो। जिवा जिवाला प्रश्न पडे तो।। 18

भेद-बुद्धिमधि-अभेद नांदे। विघ्न निर्मिती भेद विनोदे।।
शीतल वारा कुणा दिसेना। स्पर्श सुखवितो परी जिवाना।।
सुखी व्हायचे आत्म्याचा गुण। परि रडविती तिथे धूलि कण।।
व्यवहारातिल भेद जाणता। अखंड आत्मा कळे तत्वता।। 19

धर्म शास्त्र स्वाध्याय ग्रंथ ते। आणि सद्‌गुरू प्रसाद दाते।।
व्यवहारातिल तत्व सांगती। परमार्थाची तिथे प्रचीती।।
परमार्थाचे ज्ञान ज्ञान ते। परमात्म्याविण नसे आन ते।।
अन्य ग्रंथ ते पोपटपंची। सुविचाराची तिथे न उंची।। 20

एखाद्या घरातून कशाचाच आवाज येत नसेल, सारे शांत व शून्य असेल तर बाह्यत: ते घर, घर वाटणार नाही. त्यातून जर भांडणाचा, हसण्याचा, रागावण्याचा, प्रीतीचा आवाज येत असेल तर ते घर जागृत वाटते. तसेच कर्म आणि जीव यांचे नित्य भांडण चालू असेल तर त्याला जीवन असे आपण नाव देतो, हे कसले जीवन ? ज्यात शांती नाही, मांगल्य नाही, प्रीती नाही, समाधी नाही, ते जीवन जीवन कसे असेल ? पण अनादि कालापासून आपणाला कर्मबद्ध जीवन

पाहाण्याचा सराव आहे. राग-लोभाचे, शत्रु-मित्रत्वाचे, सुख-दु:खाचे जीवनच अनुभवण्याचा सराव आहे, सवय आहे. त्यामुळे सुशांत मंगल जीवन, ध्यानमय जीवन, कोलाहलरहित जीवन आपणाला अळणी वाटते. परंतु जर एकदा शांत ध्यानस्थ बसलेल्या वीतरागी प्रभूचे दर्शन झाले तर मग कोलाहलमय जीवनातून तुम्ही निवृत्त व्हाल. पण दृश्यजगाची एवढी पकड आपल्या मनावर आहे की परमात्म्याची शांत, विकाररहीत ज्ञानमय अवस्था पाहण्याचा प्रयासच आपणाकडून होत नाही.

अखंड, अभेदमय आत्मा एकीकडे व खंड खंड झालेले वा असलेले कर्म परमाणूमय विश्व दुसरीकडे, असा नित्याचाच प्रसंग आहे. एका अखंड, चिन्मय आत्मतत्वाकडे पाहण्याची आजवर कधी बुद्धीच झाली नाही. त्यामुळे प्रापंचिक सुख-दु:खाच्या आंबट-गोड प्रसंगात आपण गुंतून बसलो आहोत. वाळूचेच किल्ले बांधत आहोत. हे माहिती आहे की हे किल्ले पुन: वाळूच होऊन जाणार आहेत.

जेथे खंड खंडपणा आहे त्याच्यात अखंडत्व लपलेले आहे. वरू न जे अनित्य दिसते त्याच्या अंतरंगी नित्यत्व दडून आहे. एका बीजात असंख्यवृक्ष दडून आहेत. वृक्षाच्या फांद्या, पाने, फळे म्हणजे वृक्ष नाही. समग्रतेने सारे खंड स्वीकारले तरच अखंडत्व दृष्टीस पडते.

अशा प्रकारे दृश्य असा व्यवहार वाद आणि अदृश्य असा निश्चयवाद याचा निवाडा सद्गुरू , शास्त्र यांच्या सहाय्याने प्रत्येकाने स्वतंत्रपणे करायचा आहे. शास्त्र व गुरू तर शक्यतेचा बोध करू न देतात. खरी प्रचीति, खरा अनुभव ज्याचा त्यानेच घ्यायचा आहे.

□□□

गरुड भरारी दीपकिडे ते। पाखरेच पण गुणी भिन्न ते।
भिन्न भावना तीच विषमता। आत्म प्रचीती तिथेच समता।। 21

तू तर ज्ञानी मूत चेतना। सुख न मिळे जगि जड जीवना।।
सत्य व्रताची तुला आवडी। तुला न रुचते चोरि लबाडी।।
शुद्ध मार्ग जरि तुज आढळला। तरी पाहिजे प्रवास केला।। 22

प्रवासात या तुला भेटती। भले बुरे जन भिन्न प्रकृती।।

असुनि जलातचि अलिप्त असते। कमल सरोवरि तेवि मुक्त ते।।
तू तर आत्मा नित्य मुक्त तू। धर्म सत्य तू अविनाशी तू। 23

साध्य साधना हवेच साधन। आत्म साधना धर्म विलक्षण।।
जिथे न श्रद्धा ज्ञान नव्हे ते। ती निष्क्रियता जिवास छळिते।।
तू तर आत्मा राज्य तुझे हे। साहिल ओझे कोण दुजे हे।। 24

नव्हेच निद्रा नव्हे जागृती। विघ्न थोर हे स्वप्न भ्रमंती।।
स्वप्न संभ्रमी तारिल तो गुरू । विश्वविलासी काम कल्पतरू ।।
आत्मगुणाचा विसर पडेना। कर्मबंध तरि घडे जिवाना।।
दर्पणात जरि सूर्य भासतो। परि न समावे दर्पणात तो।।
इथे तिथे तो तरी उष्णता। ती सूर्याची स्वभावसत्ता।।
स्वभाव सत्ता जगी निरंतर। असो भूपती असो मुनिश्वर।। 25

गरुड आणि रानकिडे हे दोघेही उडणारे प्राणी. पण दोहोत किती अंतर ? दोघेही जिवंत प्रामी. पण एकाला आकाश ठेंगणे तर दुसरा अत्यंत अशक्त. ही जी भेदाची दुनिया आहे तीत विषमता दिसते. ही विषमता दृष्य स्वरू पाची आहे. पण आत्म प्रचीती जगात कुणालाही येवो, कोणत्याही काळी, कोणतयाही देशात येवो, कोणत्याही काळी, कोणत्याही देशात येवो ती सारखीच असते. आत्मज्ञानात विषमता नाही. ती सदासर्वदा एकसारखीच सते तसेच हिंसा ही दृश्य आहे तो आत्म्याचा स्वभाव नाही. अहिंसा, सत्य, प्रेम, ही सारी अदृष्य आहेत. ती सारी आत्म्याचीच रू पे आहेत.

आत्म्याने कर्मप्रकृतीची मदत घेऊन जी असंख्य दृश्य-दुनिया निर्मिली आहे, भेद निर्मिले आहेत ते सारे वरवरचे आहेत. अनित्य आहेत म्हणून अमृतत्वाकडे, विशुद्धत्वाकडे वाटचाल करायची तर भेदातून अभेदाकडे गेले पाहिजे. भेदात राहुनही तू निर्लेप, निरंजन, मुक्त राहू शकतोस, जसे चिखलातील कमल.

कोणतेही साध्य मिळवायचे तर साधन हवे. साधनतेही शुचिर्भूतता हवी. आत्म-साधनेची ही गोष्ट आहे. आत्म-साधना हाच खरा लोकविलक्षण धर्म आहे. श्रद्धा, ज्ञान आणि सम्यक्आचरण यांची एकता हवी. तरच आत्म-साधना पूर्ण होते. त्या आत्म-साधनेचा आत्म साम्राज्याचा तूच

स्वामी आहेस. त्या साम्राज्याचा सांभाळ तुलाच करावा लागणार. दुसरा कोणी येऊन ते सांभाळेल हा तुझा भ्रम आहे.

समाधी म्हणजे निद्रा, समाधी म्हणजे प्रभूची कृपा. त्याचा प्रसाद प्राप्त करण्याची, त्याच्याशी संवाद साधण्याची संधी. ज्याला आपण जागृती म्हणतो ते तर स्वप्न आहे. एक सुंदर, मोहक स्वप्न, हे स्वप्नच तर जागृती येऊ देत नाही. महानिद्रेतून जागृत होऊ देत नाही. या महानिद्रेच्या संभ्रमावस्थेतून केवळ सद्‌गुरू च तुला तारू शकतील. अन्यथा हा कामानारू पी कल्पतरू तुला सुखाच्या भ्रमात ठेवील. उद्याच्या आशेने पुन: त्याच त्याच कर्मबंधात तू अडकून पडशील. एखाद्या दर्पणात जरी सूर्य दिसत असला तरी तो खरा सूर्य नाही. त्या सूर्याची स्वयंप्रभा आरशाला कशी प्राप्त होणार/? तीच गोष्ट आत्म्याची आहे. आत्मसूर्याचा स्वयंभू प्रकाश कर्मबद्ध दर्पणात कसा सामावणार ? म्हणून स्वयंसत्तेचा आत्मप्रकाश सर्व जीवात्म्यांना तारणार आहे. तीच त्यांची स्वाभाविक सत्ता आहे.

□□□

शिंपल्यात जरि मौक्तिक माला। परी न मोती गमे शिंपला।।
तेवि शरीरी जरि परमात्मा। तरी नव्हे जड पुद्‌गल आत्मा।।
परमात्म्याची भेट हवी तर। करी प्रेम त्या परमात्म्यावर।। 26

बहिर्दृष्टिने ज्ञान नासते। कर्म बंध हो जिवाजिवाते।।
बहुरू प्याचे सोंग टाकिता। विमुक्त आत्मा तूच तत्वता।।
ज्ञानवंत तू तुला नेणसी। जडबुद्धीच्या भ्रमांत पडसी।।
आणिक होशिल जडाहूनि जड। भवचक्रातुनि सुटणे अवघड।।
दृष्टि आंधळी बुद्धि शुद्ध ना। तोच जिवाची आत्मवचना।। 27

नव्हेस तू जड पुद्‌गल ओझे। शिरी मिरविसी मानुनी माझे।।
बुडेल ते जड बुडू नको तू। रडविल हे जग रडू नको तू।। 28

हा विश्वाचा भव्य पसारा। सत्य शोधिता प्रभूच सारा।।

तिथे कोण तू तिथे कोण ते। प्रभु पूजेचे दिव्य द्रव्य ते।।
दृष्य वस्तुतुनि शुद्ध शोधितो। तो तीर्थंकर जना वंद्य तो।। 29

वचन तयाचे ती भगवत् स्तुति। भगवंताची रम्य मूर्ति ती।।
रम्य मूर्ति ती परमात्म्याची। ज्योति अखंडित परमात्म्याची।।
समान तेथे राव रंक जन। समान तेथे भक्तिरसायन।।
भक्तिरसाची अवीट गोडी। कर्मबंधना समूळ तोडी।।
पुरे अंतरी ज्ञानशलाका। बंधमुक्तिची तिथे न शंका।।
सदैव श्रद्धा सदैव भक्ती। सदैव प्रीती आत्मप्रचीती।। 30

शिंपल्यात मोती दिसून येतो. पण शिंपला मोती नाही. तसेच शरीरात आत्मा वास करतो, पण शरीर आत्मा नाही. शरीर हे त्या परमात्म्याचे मंदिर आहे. त्या शरीराचा द्वेष करू नका. त्याचा छळ करू नका. त्याला पायरी करा ध्येयसिद्धीचे शिखर गाठण्यासाठी जो ध्यान करील तो तसाच होऊन जाईल मग आपण परमात्माच होऊन राहू. परंतु शिंपल्याला मोती समजल्याने शरीराला आत्मा समजल्याने, आपली दृष्टी अंध झाली आहे. ज्ञानाचे अंकुर कोळपले आहे. प्रीतीची गंगा संकुचित झाली आहे. परमात्म्याचा सुगंध सर्वत्र दरवळत असूनही तो आपल्या नाकाला जाणवत नाही. याचे जागृत कारण आपली अज्ञानमयदृष्टी जो पर्यंत प्रेमाची दिव्य दृष्टी जागृत होत नाही, भक्तीभाव उचंबळून येत नाही तो पर्यंत हे भवचक्राचे भ्रमण चालूच राहील.

भोवतालची ही जडात्मक सृष्टी स्वतःच्या स्वभावानुसारच उत्पन्न होईल व नष्ट होईल. तिच्या मागे लागून त्या जडत्वाचे ओझे आपण का वाहायचे ? जे जे नष्ट होईल ते ते नष्ट होऊ दे. त्यासाठी आपण का रडायचे वा हसायचे. या विश्वातील ही विविधता, हे वैचिव्य म्हणजे त्या विराट महासत्तेची बदलणारी रू पे आहेत. जीवजडची ती लीला आहे. पण त्यातही जीव वेगळा व जडत्व वेगळे आहे. हे शुद्धाच शोधणे व विभक्तत्व शोधणे तीर्थकरांना शक्य झाले आहे. म्हणूनच तो सर्वांना वंद्य झाला आहे.

तो परमात्माच आहे. त्या परमात्म्याचे दिव्य दर्शन प्रत्येक जीवात घडणे हेच प्रेम, हीच अहिंसा व तेच सत्य आहे. तो अखंड, अभेद्य, अदाह्य परमात्माच सर्वभूती नित्य वास करू न आहे याची जाण हेच खरे ज्ञान. त्या स्वरुपातच रमणे हेच सम्यक्चारित्र्य हीच भक्ती आहे.

राजधानि ती नच राजाविण। परी न राजे दुजे नगर जन।।
तेवि मुक्त तू स्वतंत्र आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 31

तू तर आत्मा मुक्त सदाचा। दास होशि का दश प्राणाचा।।
जिंकिताच ती जग जेतेपण। सहजचि येईल तव पदि चालुन।।
जगद्वंद्य तू प्रसन्न आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 32

मोह कर्दमी नको वावरू । मार्ग दावितिली तुला सद्‌गुरू ।।
वीतराग गुणि दिगंबरा रे। दे फेकुनि जड किल्मिष सारे ।।
धन्य जितेंद्रिय जीव जिनेश्वर। तूच तयाचा प्रतिनिधि सुंदर।। 33

चंदनगंधा वरित मृत्तिका। सुगंध येथे तिथे सारखा।।
स्वपरभेद हा जिवास ठाया। कोण आपुला कोण पारका।। 34

परिट घडीचे घेऊनि कपडे । परिट मिरवितो इकडे तिकडे।।
मालक म्हणतो वस्त्र मला दे। परिट तयाला म्हणे विनोदे।।
वस्त्र सुताचे वस्त्र रेशमी। खरे दिगंबर तुम्ही आणि मी।।
भेद शोधिता विवेक जागे। त्याग बुद्धि ये सवेच संगे।।
त्याग पराचा तो परमार्थी। नकोच जगणं जीवन स्वार्थी।।
तिथेच दर्शन ज्ञान चरित ते। साम्य भावना तिथे नांदते।। 35

आपले शरीर ही एक राजधानी आहे. आत्मा ह त्याचा राजा. तो नित्य मुक्त आहे. त्याचा स्वभावच तसा आहे. बद्ध असूनही मुक्त. परतंत्र दिसत असूनही नित्य स्वतंत्र. एखादा चित्रकार चित्र रंगवतो, पण तो म्हणजे चित्र नव्हे. तसेच संसारातील विविध कर्मे करीत असून देखील तो म्हणजे कर्म नाही. दशप्राणांचा उपयोग करीत असूनही तो म्हणजे दशप्राण नाही. आत्मविजयात

सर्व विश्वविजयाचा आनंद त्याला प्राप्त होतो. त्यामुळेच आत्मा परमात्मा होऊन जगत्‌वंद्य होतो. तोच वीतराग, सर्वज्ञ व जगहितकर्ता ठरतो.

एखाद्या परिटाने दुसऱ्याने धुण्यास दिलेले कपडे धुवन, त्यांना चांगली इस्त्री करू न स्वतःच परिधान केले. त्या कपड्याच्या मालकाने त्याला हटकले व तो म्हणाला, "हे तर माझे कपडे आहेत. ते मला दे.' तेव्हा परीट त्याला विनोदाने म्हणतो, " हे तर कपडे सुताचे आहेत. रेशमाने विनलेले आहेत. तुमचे वस्त्र  कसे तयार होईल ? तुम्ही आणि आम्ही तर खऱ्या अर्थाने दिगंबर आहोत. "कपडे माझे, कपडे तुझे' हा तर भ्रम आहे. ते कुणाचेच नसतात.

अशा रीतीने जो जाणता-नेणता आहे, तो देह आणि आत्मा यातील भेद जाणून घेऊन स्वतःला परपदार्थापासून वेगळा जाणतो. हीच साम्य भावना आहे. हीच खरी साधना आहे.

□□□

सोड गाठीची सुवर्ण ग्रंथी। क्षणात येईल तुज श्रीमंती।।
राख कोळसे आणि अग्नि कण। रू प अग्निचेत्रिविध विलक्षण।।
अनंत गुणि तू तसाच आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 36

अमेदांत सुख देह दुःखमय। जीव प्रपंची बनेल निर्भय।।
भवभय मोचक ज्ञान अंतरी। बुडी मारू नी पहा घडीभरी।।
भव तारक ते ज्ञान पोहणे। जल न बुडविते भयांत मरणे।।
जीव जिनेश्वर सदैव निर्भय। तिथे शांति सुख ते सुख अक्षय।। 37

थेंब जलाचा नव्हेच सागर। हस्तिदंत ना गज-राजेश्वर।।
देह निमाला जीव अनादी। जन्म मृत्युची तिथे न व्याधी।।
म्हणुनि कुणी का मारिते। धर्म रक्षितो व्यवहाराते।। 38

धर्म अहिंसा अधर्म हिंसा। एक अग्नि तर एक कोळशा।।
चैतन्याची तरहा निराळी। जड कर्माणु सदैव जाळी।।
जगात शाश्वत एकच आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 39

धर्म सखा तो विवेक वादी। व्यवहाराची सुवर्ण संधी।।
नित्य साधितो तोच शहाणा। सत्य कळेना कधी दुर्जना।।
दश प्राणांनी शरीर नटले। मीच शरीरी जिवा वाटले।।
जड देहाचा कळेना कावा। तोवरि जीवा नसे विसावा।।
अविश्वास भय तिथेच हिंसा। स्वधर्म कौशल धर्म अहिंसा।। 40

परमेश्वराला ईश्वर म्हटले आहे. ऐश्वर्ययुक्त जीवात्मा म्हणून तो ईश्वर आहे. खरे ऐश्वर्य हे परपदार्थांच्या संग्रहातून येत नसून हृदयातील खरी संपन्नता आत्मज्ञानातून येते. राख, कोळसा, आणि निखारा ही तीन रू पे आहेत. श्रद्धा, ज्ञान, आणि चारित्र्य यांनी साधारण कोळसा पेटून निघतो व तो निखारा म्हणविला जातो. प्रत्येक कोळशात हे सामर्थ्य आहे. तसेच आत्म्याचे वहिरात्मा, अंतरात्मा व परमात्मा अशी तीन रू पे दिसून येतात.

देहमयता ही दु:खकारक आहे. आणि आत्मरू पता ही सुखकारक आहे, अशी स्पष्ट जाण आली की सारे सुख तिथेच आहे. भवचक्रात सापडण्याचे व मुक्त होण्याचे सारे तंत्र त्याचेच आहे. पोहता आले की पाणी बुडविते हा भ्रम दूर होतो. पाण्याची भीती दूर होते. तसेच संसारातील सुख-दु:खाचे आहे.

समुद्रातील एक थेंब म्हणजे सागर नव्हे. परंतु जेव्हा तो समुद्रात सामावला आहे, तेव्हा तो समुद्रच म्हणविल जातो. त्याचे अस्तित्व विराटात विलीत होते. तसेच आपले आहे. आपल्या जीवात्म्याची एक अवस्था त्या परमात्म्याच्या विराट अस्तित्वाचा केवळ एक अंश असते.

अशा विविध प्रकारांनी जिनेश्वरांनी जीव आणि जडाचे हे कोडे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच खरा धर्म म्हणजे अहिंसा, प्रेम, करू णा आणि अधर्म म्हणजे हिंसा, द्वेष, लोभ इत्यादी विकार ते विकारही आत्म्याच्या अशुदधपणाची साक्ष होय. अशी चैतन्याची तऱ्हा आहे. स्वत:च शुद्ध आमि स्वत:च अशुद्ध स्वत:च संसारी आणि स्वत:च मुक्त. अशा परस्पर विरोधी वाटणाऱ्या, पण तशा नसणाऱ्या, अवस्थांचे, गुणांचे पृथ:करण करू न जीव स्वर्येच परमात्मा होतो.

□□□

कुण्या नृपाची मिरवणूक ती। कुणि बालिका पहात होती।।
असेल राजा भला थोरला। परि माणसा समान गमला।।

राज्यश्रीची तीच भव्यता। जिवा जिवातिल रम्य दिव्यता।।
कमल मृत्तिका आणिक पाणी। सरोवराची रम्य आखणी।।
विशुद्ध पाणी अशुद्ध माती। नयन मनोहर कमल प्रकृती।।
व्यवहाराच्या अतीत होता। तत्व अलौकिक येइल हाता।। 41

जड सृष्टीचे रू प क्षणिक ते। क्षणा क्षणाला तुला शिकविते।।
नश्वर काया तू नच नश्वर। तू परमात्मा प्रति परमेश्वर।। 42

परवस्तूची चटक लागली। पुद्‌गल कर्दमि मति गुंगली।।
अज्ञानाचा प्रपंच पट तो। पंडिताच प्रभु तिथे प्रगटतो।।
सकल सृष्टीवर तुझीच सत्ता। तिथेच समता तिथेच ममता।।
परि न आठवे स्वतंत्रता ती। जिवा जिवाची अधोगती ती।। 43

जिवाजिवामधि नित्य भिन्नता। कुठे दिव्यता कुठे भव्यता।।
खमंग कोठे पुरण पोळि ती। परि लोखंडी चणे न शिजती।।
कर्म चुकेना जगी कर्मफल। घडे भोगणे तिथेच निश्चल।।
ज्ञान लाभता तुटति बंधने। आणि प्रगटती पुण्य लक्षणे ।। 44

राजहंस तू होशिल तेव्हां। दूध आणि जल निरखिसि तेंव्हा।।
मुक्त होण्याचा सेवुनि चारा। जगी विहर तू धर्म पाखरा।। 45

आणखी एक उदाहरण. एखादा राजा खूप मोठ्या मिरवणुकीने निघाला होता. अबोध बालिकेने ती पाहिली. कुठे आहे राजा ? हा तर चार माणसासारखा माणूस आहे. केवळ सुंदर वस्त्रे, मुकुट मोत्यांचे हार यामुळे का माणूस राजा होतो ? तसेच शरीराचे व आत्म्याचे आहे. पाणी, चिखल व कमल. यात कुठे साम्य आहे ? कमळाचा सुवास, त्याचा रंग त्याचे सौंदर्य पाण्याला नाही, चिखलाला नाही. तीन्ही एकत्र असूनही वेगळे. तसेच या आत्म्याचे आहे. त्याची तुलना कोणत्याही सर्व श्रेष्ठ पुद्‌गलाशी होऊ शकत नाही.

या विवेकातून एक तत्व आपणाला गवसते, ""नश्वर काया, तू नच नस्वर तू परमात्मा प्रति परमेश्वर''

अशा रीतीने सर्व विकल्पातून जो दूर होऊन परमेश्वरातच स्वत:ला पाहातो. परंतु बाह्यत: रमणारे, त्याचाच ध्यास घेणारे मन लवकर बाहेर येत नाही. असंख्य जन्माचे संस्कार इतके दृढ असतात की त्या संसारिकतेतून तो बाहेर पडू शकत नाही. अज्ञानाच्या प्रचंड अंध:कारातून बाहेर पडायला त्याला सवडच मिळत नाही. डोळे मिटले असल्याने सूर्यप्रकाश त्याला दिसत नाही. तो अज्ञानाचा पट दूर होताच समोरच उभा असलेला प्रभू दिसून येतो. त्याचा शोध घेण्याचे कारणच काय ? साक्षात चैतन्य महाप्रभू या देहातच ठाण मांडून बसला आहे. पण कर्मबंधनाचे भोगामुळे त्याचे दर्शन घडत नाही.

राजहंस झालात की पाणी आणि दूध यातील भेद लगेच लक्षात येतो. मोत्यांचा चारा सेवन करू न मुक्त आकाशात झेप घेणाऱ्या हे धर्मपाखरा, तू सर्वांचा मित्र आहेस. सर्वांच्या कल्याणाची धर्मभावना हेच तुझे पंख आहेत. त्या मुक्त आकशातही पूर्व जन्मीचे वैरी तुला भेटतील. पण त्यांच्या वैरात तू पडू नकोस. कुणी कुणाचा मित्र असत नाही व शत्रूही असत नाही म्हणून शांत राहून समता भावनेने साऱ्या विश्वाला तू पहात राहा. तुला मोठेपणा असेल, तू श्रीमंत असशील समृद्ध असशील तर सारे तुझ्या भोवती गोळा होतील, मुजरे करतील, जयजयकार करतील. पण हे देखील एक नाटकच समज. त्या नाटकातील सुखात तू रमलास तर तुझी मुक्त अवस्था हरवून बसशील. जड बुद्धीने विणलेल्या या प्राणघेऊ जाळ्यात अनेक जीव सापडतात व जन्म-मरणाचे दु:ख भोगतात. त्या सुख-दु:खालाच अमृत मानून जगणाऱ्या मानवाला काय म्हणावे ? रवि-उदय झाला की घनांधकार टिकत नाही. मृत्यूला जीवन समजून खरे अमरपण तू का टाळतोस ? इष्ट-अनिष्ट ही केवळ भावना आहे. कोणत्या वेळी काय इष्ट आहे, काय अनिष्ट आहे याचे भानच राहात नाही. मन अशात होऊन जाते. समत्वाचा, शांततेचा बिघडतो.

□□□

लोकमित्र तू शत्रु तुला पण। तुला भेटतील सेवेचि आपण।।

मानधनाच्या करितिल चेष्टा। पावशील तू तिथे प्रतिष्ठा।।

काल बदलता वैर साधिती। तिथे आपपर येइ प्रचीती।।

तिथे आत्मरत तोच शाहणा। सुख दु:खातही विवेक बाणा।।

सौख्य आपुले वाटित सारे। दु:ख भोगिता मुळि न घाबरे।।

तोच भूवरी प्रसन्न आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 46

जड आणिक चैतन्य भिन्न ते। होति कुणाचे कुणि न मित्र ते।।
तुझे शत्रु ते ती जड बुद्धी। तुला देति ते दु:ख उपाधी।।
उपाधीस त्या दूर सारिता। त्वरे आत्मपद येइल हाता।। 47

तुझे शत्रु ते मित्र तयाचे। शिरी धरिति तव छत्र भ्रमाचे।।
छत्रपती तुज म्हणतिल सारे। प्रेमभराने करितिल मुजरे।।
सर्व नाटकी खेळ तयाचा। तूच एकला प्रभू जगाचा।। 48

संसारातिल सुखात रमता। हारपेल तव मुक्त अवस्था।।
जडबुद्धी जगि विणीत जाळे। त्यात जीव हे किती सापडले।।
बुडेल आपण तुलाही बुडविल। पायदळी तुज वृथाच तुडविल।।
विषात अमृत मानु नकोरे। घनांधकारी रवि न संचरे।। 49

मृत्युलाच का मानुनि जीवन। दूर लोटिसी तुझे अमरपण।।
कारण आणिक कार्य एक ते। नच मातीचे सुवर्ण बनते।।
जगी जडाच्या मुखात माती। शाश्वत सुंदर आत्म प्रचिती।।
इष्ट वियोगे अनिष्ट घडते। अनिष्ट घडतां शांति भंगते।।
अशांततेमधि कर्म कटकटी। अशांततेमधि भल्या खटपटी।।
कर्मपटलि या ज्ञान झाकले। अंतरंग तप मलीन झाले।। 50

आत्मस्वरू पी निर्मल आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।।
आत्म स्वरू पी लीन होइना। नच घाण्याचा बैल शाहाणा।।
तोंड बांधले चाबुक पाठी। कर्मगतीची मति उफराटी।।
तोड बंधने वरिशिल मुक्ति। तिथे पाहिजे आत्म प्रचिती।। 51

जीव जडाची अशुभ संगती। जिवा जिवाच अधोगती ती।।

धर्म आठवे कर्महि सुटते। तरि पाण्यातिल अंतराळ ते।।
गगन कुठे ते मातट पाणी। अधोगतीची कर्म कहाणी।। 52

कर्म संचये धर्म घडेना। पुण्य वाढवी अहं भावना।।
हीच अहंता जिवास जाळी। राग लोभभय शत्रु मंडळी।।
कळप मृगाचा मनात भीतो। स्वतंत्र आत्मा सिंह वाघ तो।।
तुझ्या भोवती बंधन सारे। गगन भरारी घेइ जिवा रे।।
गगन भरारी उर्ध्वगती ती। अनंतात त्या आत्मप्रचिती।। 53

कामक्रोध ना कुठे स्वार्थ तो । परमार्थाचा रम्य प्रांत तो।।
तिथे न जडता अशिव भावना। आत्म शक्तिची समाराधना।।
निजानंद तो जिकडे तिकडे। जिवा जिवाचे सुटे साकडे।। 54

कुंभाराच्या घरात माती। घागर मडकी तवा पराती।।
फुटले रांजण पुन: मृत्तिका। कुंभाराला कुठे न धोका।।
जडातील तू स्वतंत्र आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 55

म्हणूनच आत्म-स्वरूपात जो लीन आहे, तत्पर आहे, उद्यत आहे त्याची शांती भंगत नाही. कारण जीव आणि जड यांच्या संबंधाने सारे संसाराचे चक्र उरफाटे फिरत राहाते. जड कर्माच्या आस्त्रवाने खरा धर्म घडत नाही. घडू शकत नाही. तो आस्त्रवच मोठा प्रिय होऊन जातो, त्यात अहंबुद्धी निर्माण होते. कर्म फळांच्या रसात तो जीव एवढा निमग्न होतो की त्याचे स्वत्वच हरवून जाते. परंतु हृदयात-आत्मसिंह जागृत झाला तर कर्म, कर्म-फळ-रूपी हरिणे घाबरून पळून जातात. पण त्यासाठी आत्मसिंहाची जागृती आवश्यक आहे. त्या जागृतीच्या क्षणीच एक दिव्य क्रांती घडून येते, एक पाऊल प्रभूच्या दिशेने पडते. ते पहिले पाऊलच जीवाच्या उर्ध्वगमनाचा ओनामा होऊन जाते. असा सहज समाधी अवस्थेत कुणाचा राग-लोभ, मद-मत्सर, ईर्षा-असूया राहणार ? सारे वादळ शांत शांत होऊन जाते. जणु काही घडलेच नाही. नव्या दिव्य आत्मशक्तीची सहस्त्र किरणे प्रस्फुटित होतात. त्यात सर्व न्हाऊन निघते. आनंदाच्या डोही रमणाऱ्या आत्मप्रभूचे अनंत दर्शन घडून जाते.

विश्व सृष्टिचा तूच आरसा। जीव तुझ्यावर ठेवि भरवसा।।
असेल तैसे दिसेल तेथे। आत्मरू प ते तुझे आयते।।
तूच ज्ञानमय निजानंद घन। जिथे तिथे तू तुझेच दर्शन ।। 56

बाग फुलाची तिथेच माळी। परि बीजाची कळा निरळी।।
बीजाविण जगि बाग फुलेना। परि माळ्याविण पान हलेना।।
बीज बाग फल आणिक माळी। संसाराची रम्य साखळी ।। 57

प्रपंच हा परमार्थ जाणतो। म्हणूनि जगाला गमे बंध तो।।
अथांग सागर उफाळतो नित। भरति ओहटी क्रिया ही अद्‌भुत।।
परि न सोडिता कधि मर्यादा। जीव भ्रमाने भोगि आपदा।। 58

जडास जाणिव नसे कोण मी। नियम सृष्टिचे हित परिणामी।।
वायु जलाचा सुरेख संगम। नाचति लाटा तिथे नसे भ्रम।।
परंतु मानव तिथेच भ्रमतो। बुडेन का मी जलात म्हणतो।।
जलात बुडता मृत्यु चुकेना। जन्म मृत्यु भवबंध तुटेना।।
सांगति लाटा सदा गर्जुनी। जीव निराळा जड देहाहुनि।। 59

जगी हुडहुडी भरे अग्निला। प्रवाद ना हा कुणी ऐकिला।।
सृष्टि सतीची सर्व लेकरे। धर्म आपला पाळितात रे।।
असतील ते जड असोत कोणी। एक निराळा दुजापासुनी।।
जो गुण ज्याचा तोच प्रगटतो। सज्जन ना कधि दुर्जन बनतो।। 60

कुंभाराच्या मनात संकल्प असतो. त्या प्रमाणे तो विविध प्रकारची मातीची भांडी बनवतो. पण ती सारी भांडी फुटली की सारी मातीच. तसेच विविध शरीर धारण करणारा आत्मा त्या सर्व शरीर प्रक्रियांचा त्याग करू न एक शुद्ध चिदानंदमय स्वरू पातच रमून जातो.

आत्मा म्हणजे एक दर्पण. एक स्वच्छ, निर्मळ आरसा. त्या दर्पणात तुझेच सानुले रू प आहे. तूच त्या आरशातील ज्ञानधन चित्स्वरू प आहेस. तसेच आत्मा हे एक बीज आहे. त्या बी मधूनच मोठे डेरेदार वृक्ष होतात. त्याला फळे लागतात. बी, बाग, फळ, माळी ही एक सुंदर साखळी आहे. असे बी शिवाय वृक्ष नाही; माळ्याशिवाय मशागत नाही, तसेच हा जीव परमात्मा कर्म फळांचा तेवढ्यापुरता कर्ता. तेवढ्या पुरता भोक्ता. पण खऱ्या अर्थाने तो सर्व कर्मफळांचा अकर्ता आणि अ-भोक्ता आहे. जो कर्ता मानतो तो प्रपंचात आहे. जो स्वत:ला अ-कर्ता अ-भोक्ता मानतो तो परमार्थात आहे. प्रत्येक पदार्थ समुद्राप्रमाणे आपआपल्या मर्यादेत आहेत. प्रत्येक पदार्थ-सत्ता स्व-सत्तेतच शोभून दिसते. जरी भरती ओहोटीची क्रिया दिसून येते तरी समुद्राच्या स्व-मर्यादेत काहीच फरक पडत नाही.

वाऱ्याने समुद्रात प्रचंड लाटा उसळत राहतात. त्या उसळलेल्या लाटा समुद्रातच पुन: समालीन होतात. पण मानव मात्र अशा लाटांना घाबरतो व त्याला जन्म-मरणाची उपाधी प्राप्त होते. त्या लाटा म्हणजे समुद्राची एक अवस्था, एक पर्याय. तसेच जन्म-म्यृत्यु जीवाची एक अवस्था, ते म्हणजे जीवन नाही. त्या समुद्राच्या लाटा नित्य गर्जना करू न सतत हेच सांगतात की "जीव निराळा जड देहाहुनी.'

तसेच अग्नीला हुडहुडी भरली अशी घटना कधीच ऐकविता येत नाही. कारण अग्नी स्वत:चा उष्ण स्वभाव सोडत नाही. तसेच जगातील कोणताही पदार्थ आपले "स्वगुण' मोडत नाहीत.

□□□

जड न चेतना नव्हेच तू जड। परि बंधातुनि सुटणे अवघड।।
अग्नि जाळितो गवत वाळले। ज्ञान सृष्टिचे तुला न कळले।।
काल अनादी अनंत तू तर। तुझीच सत्ता कालगतीवर।। 61

कालगतीचा चालक मालक। चक्रभ्रमामधि मानितोस सुख।।
फुले कागदी सुरेख गमती। परी न परिमल तेवि कालगति।।
रंग बेगडी सुगंधात सुख। उडेल बेगड तुझ्याच सन्मुख।। 62

कळेल तुजला कोण खरा तू। सुख दु:खाच्या अतीत सहो तू।।

देह बुद्धीने सौख्य मानिसी। देह बुद्धिने दु:ख भोगिसी।।
धन्य विदेही तू तर आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 63

आकाशातिल विशुद्ध पाणी। पडे ममुद्री पिई न कोणी।।
संग बाधला तसा तुलाही। कुसंगतीतुनि सावध होई।। 64

रंग जगाचा जळात मासे। जड बुद्धीने जीवन नासे।।
नाशिवंत जग जीव जाणतो। परी न सावध कसा होत तो।।
जीव जाणता जगि अविनाशी। सम्यग्दृष्टी हवी तयासी।। 65

म्हणूनच चेतना कधी मृतवत् होत नाही. जड होत नाही. तसेच जड पदार्थही चेतनामय होत नाही. असे असले तरी आज तू ज्या बंधनात आहेस व त्या बंधनालाच "जीवन' मानीत आहेस ती कल्पना सोडणे हे तुला शक्य होत नाही. "अनादी तू, अनंत तू' ही श्वासाश्वासातून परमात्म्याने घातलेली साद तुझ्या कानी पडत नाही. खऱ्या अर्थाने परम महासत्तेचा तू अग्रणी. काळ तुला काय करणार ?

कालगती ही कागदी फुलाप्रमाणे आहे, ती रंगी बेरंगी फुले आहेत. पण त्यात परमात्म्याचा सुवास  कुठे आहे ? परमात्म्याचा आनंददायी सुगंध त्यात नाही. कालचक्र केवळ एक अस्तित्व मात्र आहे त्याचा परिणाम चेतनेवर होईलच कसा ? थोडे परमात्म्याच्या आत शिरू न तर पहा. त्याला मंदिर करू न टाका. त्या मंदिरात प्रवेश करा म्हणजे तू कोण आहेस याचे भान होईल. सुखदु:खाची ही लक्तरे पांघरल्याने जीवाचे परमात्म्यपद झाकळून गेले आहे. देह म्हणजे आत्मा नाही. देह हेही त्या परमात्मपद मंदिर आहे. देहमंदिरात परमात्म्याची मंगल मूर्ती आहे. त्या परमात्म्याचीच तू प्रतिकृती आहेस. देह आज आहे तर उद्या नाही. पण परमात्मा शाश्वत आहे. त्या परमात्म्याचा शोध जड शद्बानी, शास्त्रांनी घेता येणे शक्य तरी आहे का ? परमात्मा तर विदेही आहे. त्याला देह नाही. आकाशातील शुद्ध पाणी जसे समुद्रात पडले तर ते पीता येत नाही. आकाशातील शुद्ध पाणी जसे समुद्रात पडले तर ते पिता येत नाही. हा संगतीचा गुण त्याला बाधला आहे. तसेच देहात निवास करायला तू आलास  आणि देहालाच परमात्मा मानून बसलास. त्यामुळे परमात्म्याची अनंत, शुद्ध उर्जा तुला प्राशन करता येत नाही. म्हणून तुझ्या चेतनेला तू चांगल्या संगतीत घेऊन चल. परमात्म्याची ओळख, अनुभव झालेल्यांच्या संगतीत

घेऊन चल. त्या सत्संगातून तुलाही आत्म्याच्या प्रकाशात न्हायला मिळेल. आत्मदेवाचे मधुर संगीत ऐकायला मिळेल. पण अगोदर देहात गुंतलेली तुझी बुद्धी सोड व त्या देहप्रीतीच्या संमोहनातून जागा हो.

□□□

वसंत ऋतुमधि नवी पालवी। पर्जन्याने येइ टवटवी।।
हिवाळ्यात कशि सृष्टि हासते। जिवा जिवाला ग्रास घालिते।।
हा नैसर्गिक खेळ सृष्टिचा। का न कळे तुज दोष दृष्टिचा।।
तुझ्या मळे जग तू तर आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 66

राम कथा नवविचार सागर। विवेक सुंदर तत्व मनोहर।।
तत्व गुणाची मुक्त मालिका। आत्म बुद्धिने लेववि लोका।।
स्वये आचरी जनास सांगे। आणि श्रोतृगण तसाच वागे।।
वागणूक ही रामप्रभूची। सदैव सुंदर गणराज्याची।। 67

गणराज्याचा आम्हा वारसा। राम प्रभूवर ठेवु भरवसा।।
होत नराचा जगि नारायण। जन राज्याचा राम राज्य गुण।।
गुण सुमनांचा गंध राम तो। रावण कंटक कुणास खुपतो।।
गंध दरवळे खुपेल काही। राम राज्य नव हवे आम्हाही।। 68

राम दिगंबर वृत्ति वरीतो। आणि काननी विहार करितो।।
अंतर बाहिर विशुद्ध जीवन। तेवि तपाचे घडे आचरण।।
सम्यग्दर्शन ज्ञान चरित ते। जीवन सार्थक तिथेच घडते।। 69

क्षमा पाहिजे हवीच मृदुता। सरल भावना हवी शुद्धता।।
सत्य अंतरी त्याग सदोदित। वृत्ति अकिंचन ब्रह्मचर्य व्रत।।
दश धर्माचे पालन घडते। निजानंदि मन निमग्न होते।। 70

निजानंद तो स्फुरे अंतरी। नव्हे देह मी तिला न वैरी।।
नवा जन्म ना नवा मृत्यू पण। सदा मुक्त मी चिदानंद घन।। 71

चिदानंद मति रामप्रभूची। श्रेष्ठ भावना अरिहंताची।।
सर्व घातकी कर्म नासते। ध्यान शुद्ध ते शुद्ध ज्ञान ते।।
अनंत ज्ञानी अनंत सुखि तो। अनंत दर्शन वीर्यवंत तो।।
सिद्धपदावर सुखे विराजे। मुक्ति मार्ग तो जिवास साजे।। 72

श्री रामाची मुक्त भावना। धरू नि अंतरि मना सज्जना।।
सुखे भूवरी विहार करि तू। जिवा जिवातिल स्वधर्म हेतु।।
पूर्ण कराया कसले कंबर। राज्य तयाचे भरत भूमीवर।।
उद्या व्हायचे असायचे नित। राम प्रभूचे जीवन शाश्वत।। 73

जीवनात "वसंत' फुलू द्यायचा असेल तर त्या वसंताच्यासाठी प्रार्थना कर ऋतुराज वसंत हृदयातच आहे. त्या वसंताच्या आगमनासाठी काही प्रयत्न करावे लागत नाही. आकाशातून मेघांचा वर्षाव होतो. सारी सृष्टी स्वच्छ, निर्मळ, पवित्र होऊन जाते. सारे विश्वच प्रभु परमात्म्याला आळ्वीत आहे. त्याच्याच रसात, रंगात, संगीतात विश्व सामावून जाते. अनंत चेतनेची ही अनंत रू पे आहेत. प्रत्यक्ष चेतन परमात्माच जणु अनंत रू पाने प्रकट होत आहे. पण आमची दृष्टीच निर्मळ नाही. आम्ही सर्व मोहाने, अहंकाराने अंध बनलो आहोत. परमात्म्याचा प्रकाश पाहायलाच आम्ही तयार नाही.

त्याच्या आधारानेच मी या काव्यातून रामाची कथा सांगत आहे. राम एक तत्व आहे. शाश्वत तत्व आहे. राम म्हणजेच परमात्मा. राम म्हणजे परमात्म्याचे एक बीज त्या बीजातून रामाची कथा फुलते. बहरते आनंदित करते. भगवंताच्या गुणांचे प्रतिक म्हणजे रामकथा त्या कथेत व्यवहार आहे. सत्य आहे. स्वार्थ आहे, परमार्थ आहे. जीवन आहे. मृत्यू आहे. आणि दोहोंच्या पलीकडील अमृतमय भावजीवन आहे.

रामचरित्रातून एका सम्यक् आचरणाची दिशा आहे. त्या कथेचा विलक्षण परिणाम जनमानसात आजही विद्यमान आहे. रामाचे राजकारण असो की गृहस्थीपणाचे आचरण असो की पती-पत्नीच्या गूढ मनोहर जीवनाबद्दल आचरण असो, त्यातून उत्तुंग जीवन मूल्यांचे दर्शन घडते.

भारतीय जनमानसावर रामाचा एवढा मोठा पगडा आहे की सारी भारतीय संस्कृती त्याच्या भोवती विणली गेली आहे. रामाला त्या संस्कृतीतून वेगळे करता येणे शक्य नाही. भारतीय राज्यव्यवस्थेच्या उत्कटतेसाठी ही रामराज्याची कल्पना स्वीकृत आहे. कारण रामाचे राज्य हे जनतेचे राज्य आहे. तेथे घराणे राज्य राज्य करीत नाही, जनता राज्य करते. कारण नराचा नारायण करण्याची जीवनपद्धती त्यात निहित आहे. जनतेच्या आशा-आकांक्षाचे उत्कर्षाचे प्रतिक म्हणजेच राम राज्य.

आज जे भारतीय गणराज्य आहे. त्या गणराज्याचाही आधार रामच आहे. राम म्हणजे संकटक वेलीवरचं फूल आहे. रावण हा कंटकासमान आहे हे खरे, पण तोही त्या सुवासिक फुलास देणाऱ्या कथावल्लरीचा भाग आहे. रामाशिवाय जसे रामायण नाही, तसेच रावणाशिवाय रामायण नाही. मानवाचे लक्ष त्या सुंदर, सुवासिक फुलाकडेच असते. पण ते फूल प्राप्त व्हायला कंटकांचा त्रास सहन करावाच लागतो.

श्रीरामाची जडण-घडणच दिगंबर स्वरू पाची. साऱ्या दिशांना व्यापून राहणारी ती व्यक्ती रेषा आहे. चेतन-अचेतन सृष्टीच्या समग्रतेची ती कथा आहे. तिच्यात साऱ्या विश्वातील विराट अस्तित्व सामाहून राहिले आहे. विशुद्ध जीवनाचा अंतर्बाह्य स्वीकार केल्याने रामाचे जीवन एक तप:पूत जीवन आहे. संसारिक वा अध्यात्मिक अशी सीमारेखा घालताच येत नाही. "अंतरी रसाळ' व "बाह्याभ्यंतरे शुचि' असे ते जीवन आहे. क्षमा, मार्दव, ऋजुता, निर्लोभत्ता इ. जीवन संजीवक गुणही तेथे प्रकर्षाने आहेत. स्वतःच्या आनंदात ते पूर्णतः निमग्न आहे. रावणालाही "स्व' समजणारी अद्वैत बुद्धी तेथे आहे. सारे विश्वच राममय आहे. चैतन्यमय आहे हाच त्या रामकथेचा मुख्य बिंदू आहे. जन्म व मरण यांच्या अतीत असणारे एक समुत्थानाच`जीवन म्हणजे रामकथा. जीवन-मुक्ताची ती कथा आहे.

आत्मरतीच्या मस्तीत, स्वानंदाच्या डोहात रामकथा रंगते. अरिहंताचे खरे वैभव त्य कथेतून प्रकट होते. या कथेच्या श्रवणाने, मननाने, आचरणाने, श्रद्धेने एका समीचीन, सम्यक्दृष्टीचा लाभ होतो. बाह्य अचेतन कर्मांचा, त्यांच्या आवागमनाचा तेथे परिणाम पडत नाही. अंतरंगातून तो राम सर्व परपदार्थाच्या आसक्तीतून मुक्त आहे. देहातील विशुद्ध, चिन्मय आत्म्याच्या सत्संगामुळेच अनंत ज्ञान, सुख, वीर्य या गुणांचा प्रकर्ष तेथे नित्य जाणवत राहातो.

ही श्रीरामाची मुक्त भावना सज्जनांनी हृदयांत बाळगली तरच श्रीरामाची कथा हृदयांत बीजांकुर धारण करील. "स्व-धर्मा' चा खराखुरा, शाश्वत विचार मनात रहील. जो असे करील त्याचेच राज्य या भूलोकी स्थिर राहील.

हे स्व-राज्यच या पवित्र भूमिवर नित्य-नूतनतेने प्रकट होते राहील. शाश्वत जीवनाचा स्पष्ट व स्वच्छ अंगीकार हाच खरा रामकथेचा केंद्र बिंदू आहे.